# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com


**तात्काळ** /कालमर्यादा

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/9602

दिनांक :- 24 MAY 2017

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, महाविद्यालय,

शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद/जालना/अंबड/बीड/

उस्मानाबाद/पु.ला.लातुर/शा.नि.म.तं.लातुर/नांदेड/हिंगोली/

जिंतुर

**विषय :- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध बांधकामाचा आढावा..**

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचे पत्र क्र.९/डीटीई/२०१७/१३५
दिनांक १७/०५/२०१७

या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्थांना सुचित करण्यात येते की आपल्या संस्थांमधील पूर्ण/चालू/अपूर्ण व प्रशासकीय मान्यताप्राप्त बांधकामाचा परिपूर्ण अहवाल संदर्भिय पत्रातील प्रपत्र अ,ब व क मध्ये दिनांक २५/०५/२०१७ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत roaurangabad@dtemaharashtra.gov.in या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावा तसेच तो अहवाल त्रिप्रतीत आपल्या संस्थेतील बांधकामाशी संबंधित जबाबदार अधिका-याच्या हस्ते तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई येथे पाठवून त्यांना दिनांक २९ मे २०१७ रोजी सकाळी ११.३० वा संचालनालयात बैठकीसाठी हजर राहण्यासाठी प्रतिनियुक्त करावे.

तसेच शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मागविण्यात आलेली ARC सेंटर बाबतची माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावी.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२. प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

**3, महापालिका मार्ग पत्र पेटी क्र. 1967, मुंबई 400 001.**

**E-mail :-** desk9@dte.org.in **Web :-** http://www.dte.org.in

**दुरध्वनी** - 22620601, 22690602, 22641150/51 **फॅक्स** - 22692102


क्रमांक- 9/डीटीई/2017/135

दिनांक- 17-5-2017

प्रति,

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक,

औरंगाबाद/अमरावती व नागपूर

विषय - तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालिल विविध बांधकामांचा आढावा.

संदर्भ-1) शासन अर्धशासकीय पत्र क्र.संकीर्ण-2017/(19/17)/तांशि-3 दि. 19-1-2017

2) संचालनालयाचे पत्र क्र.9/बांधकाम/2017/45 दि.14-2-2017

3) शासन अर्धशासकीय पत्र क्र.संकीर्ण-2017/(19/17)/तांशि-3 दि. 3-5-2017

---

शासनाच्या वरील संदर्भीय अर्धशासकीय पत्राच्या अनुषंगाने तसेच या संचालनयलाच्या वरील संदर्भीय पत्रान्वये सुचित करण्यात आलेले आहे की, आपल्या विभागातील सर्व शासकीय संस्थामधील पूर्ण/चालू/अपूर्ण बांधकामांचा दर 2 महिन्यांनी आढावा घेण्यात यावा. त्यानुसार विभागातील संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन संस्थेतील सर्व बांधकामांची (प्रशा.मान्यतेनुसार) माहिती (संस्थेच्या सबंधित सा.बां.विभागाकडून प्रमाणित) प्राप्त करुन घ्यावी. त्याबाबत प्रत्येक 2 महिन्यांचा परिपूर्ण अहवाल संचालनालयास सादर करण्याबाबत सुचित केलेले आहे. (सोबत संदर्भीय शासन पत्र व संचालनालयाचे संदर्भीय पत्र जोडलेले आहे.) याबाबत शासनाने संदर्भीय पत्र क्र.3 अन्वये पुन्हा स्मरणपत्र पाठविलेले आहे.

या संचालनालयाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, काही संस्थांनी संस्थेच्या निधीतून प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च करुन बांधकाम पूर्ण करुन घेऊन देखिल सदर बांधकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता/शासनाची कार्योत्तर मान्यता घेतलेली नाही. तसेच काही संस्थांनी इतर स्तोतातून निधी प्राप्त करुन प्रशासकीय मान्यता न घेताच बांधकाम करुन घेतलेले आहे. अश्या सर्व संस्थामधील पूर्ण/चालू/अपूर्ण व प्रशासकीय मान्यता प्राप्त बांधकामांचा परिपूर्ण अहवाल घेऊन विभागीय सहसंचालकांनी आपल्या अधिनस्त शासकीय संस्थेतील बांधकामांशी सबंधित जबाबदार अधिका-यासह **दि.29 मे 2017 रोजी सकाळी 11.30 वा.** संचालनालयात सोबत जोडलेल्या विवरणपत्रात माहिती भरुन घेऊन बैठकीसाठी हजर रहावे.

संस्थांची बांधकाम माहिती संस्थांच्या सबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित केलेली असावी.

(डॉ.सुभाष महाजन)
सहसंचालक, तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

सोबत - संदर्भीय पत्रांची प्रत व विवरणपत्र

प्रत - मा.उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती कररण्यात येते की, सदरहू बैठकीस उपस्थित राहून सबंधितास मागंदर्शन करावे

.

**तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा , मुंबई**

**बांधकाम आढावा प्रपत्र अ**

( विभागीय कार्यालयाने प्रत्येक आढावा बैठकीनंतर भरावयाचे प्रपत्र )

**विभागाचे नांव** :- **मुंबई / नागपूर / पुणे /औरंगाबाद / नाशिक / अमरावती**

1. **चालू बांधकामांची संख्या** :

2.**वरील 1 पैकी पूर्णत्वास आलेल्या बांधकामांची संख्या (90टक्के पेक्षा जास्त प्रगती)** :

3. **वरील 1 पैकी अतिशय धिमी प्रगती असलेल्या बांधकामांची संख्या (25टक्के पेक्षा कमी प्रगती)*** :

( *अश्या प्रकरणी बांधकामाची प्रगती धीमी असल्याची कारणे संस्थांनी भरावयाच्या प्रपत्र ब मध्ये संबंधित कामाच्या नावापुढे स्तंभ १४ मध्ये नमूद करावीत. विभागीय कार्यालयाने मात्र केवळ संख्या वरील 3 येथे नमूद करावी )

4. **बांधकाम पूर्ण होऊन देखील ताबा हस्तांतरण झालेले नाही अशी प्रकरणे असल्यास त्यांची संख्या #** :

( #अश्या प्रकरणी संस्थांनी भरावयाच्या प्रपत्र ब मध्ये संबंधित कामाच्या नावापुढे स्तंभ १३ मध्ये कामाच्या पूर्णत्वाची टक्केवारी १०० अशी नमूद करावी मात्र ज्या कारणांमुळे ताबा हस्तांतरण झाले नाही ती कारणे स्तंभ १४ मध्ये नमूद करावीत. विभागीय कार्यालयाने मात्र केवळ संख्या वरील 4 येथे नमूद करावी )

5. **वरील 3 बाबत संक्षिप्त स्थितीदर्शक अहवाल** :

( विभागीय कार्यालयाने खालील तक्त्यात आवश्यक तितक्या Row वाढवून घ्याव्यात . यासाठी त्यांना सदर फाईलची सॉफट कॉपी देण्यात येईल. केवळ २५ टक्के पेक्षा कमी पूर्णत्व असलेल्या बांधकामांचे बाबत माहिती द्यावी )

| अ.क्र. | संस्था | बांधकामाचे नांव | यापूर्वीच्या आढावा बैठकीतील स्थिती @ | सध्याची स्थिती | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

@ प्रथम आढावा बैठकीचे वेळी या स्तंभातील माहिती परिशिष्ट "क " मधील स्तंभ क्र १३ नुसार घ्यावी.

6 . **आढावा बैठकीचा दिनांक व ठिकाण** :-

************

# प्रपत्र "ब"

( संस्थेने भरावयाचे प्रपत्र - one time information)

| अ.क्र | | माहिती / सांख्यिकी व परिमाण |
|---|---|---|
| **संस्थेचे नांव** :- | | |
| 1. | संस्थेकडे उपलब्ध जागा (एकर / हेक्टर /चौ.फूट/ चौ. मीटर ) | |
| 2 | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांचे मानका नुसार आवश्यक बांधकाम (चौ.फूट/ चौ. मीटर ) | |
| 3. | आज रोजी पूर्ण झालेले व उपयोगात आणलेले बांधकाम (क्षेत्रफळ) (चौ.फूट/ चौ. मीटर ) | |
| 4. | मानकांची पूर्तता करण्यास कमतरता असलेले बांधकाम क्षेत्रफळ (चौ.फूट/ चौ. मीटर ) आणि त्याचे संक्षिप्त वर्णन | |
| 5 | चालू बांधकामाचे क्षेत्रफळ (चौ.फूट/ चौ. मीटर ) | |

**तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा , मुंबई**

**बांधकाम आढावा प्रपत्र क**

(संस्थेने भरावयाचे प्रपत्र)

**सुचना:- कृपया संस्था निहाय प्रपत्र करावे. एका संस्थेच्या सर्व बांधकामांची माहिती एका खाली एक अश्या पद्धतीने द्यावी )**

| अ.क्र | बांधकामाचे नाव | कामाचे नांव कामाची व्याप्ती (Scope of work) | प्रशासकीय मान्यता किंमत (रु) | प्रशासकीय मान्यता क्रमांक व दिनांक | कामाचे आदेश दिल्याचा दिनांक व | कार्य आदेशानुसार काम पूर्ण होण्यासाठी अपेक्षित कालावधी | ३१ मार्च २०१७ पर्यंत या कामावर झालेला खर्च (रु) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

| आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी या कामासाठी राज्य वार्षिक योजनेत केलेली तरतूद रु ) | बांधकामासाठी राज्य योजनेत तरतूद केलेली नसल्यास इतर स्रोत (उदा केंद्र निधी, अल्पसंख्यांक निधी, AICTE निधी ) मधून निधी अपेक्षीत असल्यास त्या यंत्रणेचे नाव लिहावे | स्तंभ १० मध्ये नमूद यंत्रणेकडून आतापर्यंत प्राप्त एकूण निधी | स्तंभ १० मध्ये नमूद यंत्रणेकडून अपेक्षित निधी ( स्तंभ 11 मधील निधी व्यतिरिक्त) | आज रोजी बांधकामाची सद्यस्थिती व पूर्णत्वाची टक्केवारी | अभिप्राय ( कामाच्या सद्य स्थिती बाबत ) | बांधकामाची प्रगती असमाधानकारक असल्यास, त्या संदर्भात कोणती उपाय योजना आवश्यक आहे याबाबत विभागीय कार्यालयाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |